मणिपूरमधून आसाम रायफल्स हटवण्यास विरोध

इम्फाल, दि.३ : केंद्र सरकारने मणिपूरमधून आसाम रायफल्सच्या २ बटालियन हटवून त्याऐवजी सीआरपीएफची तैनाती करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला राज्यातील कुकी आमदारांनी विरोध सुरू केलाय. मणिपूरमधील ज्या संवेदनशील भागात जातीय हिंसाचार होत आहे, तेथे फक्त आसाम रायफल्स तैनात करण्यात याव्यात, अशी मागणी या पत्रात करण्यात आली आहे.

सरकार कांगवाई आणि कांगपोकपी भागातून आसाम रायफल्स हटवून सीआरपीएफ तैनात करण्याची तयारी करत असल्याच्या बातम्या आल्या आहेत. कुकी आमदारांनी आसाम रायफल्सचे वर्णन निष्पक्ष दल म्हणून केले आणि केंद्र सरकारचा हा निर्णय एक भयंकर षडयंत्र असल्याचा आरोप केला आहे. आसाम रायफल्सच्या बटालियन्स मणिपूरम धून हटवून जम्मूमध्ये तैनात केल्या जातील, असा दावा केला जात आहे. अलीकडच्या काळात जम्मूमध्ये दहशतवादी घटनांमध्ये वाढ झाली आहे, त्यामुळेच सरकार जम्मूमध्ये लष्करी तैनाती वाढविण्याचा विचार करत आहे. कुकी-जो आमदारांनी पीएम मोदींना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, मज्या वेळी केंद्र सरकार संघर्ष संपवण्याचा प्रयत्न करत आहे, आसाम रायफल्स काढून टाकत आहे आणि अशा नवीन सुरक्षा दलांना तैनात करत आहे, ज्यांना या क्षेत्राची माहितीही नाही. त्यामुळे हिसाचारात वाढ होण्याची भीती आहे. आसाम रायफल्सकडे मणिपूरमधील केंद्रीय सशस्त्र पोलिस दलांमध्ये सर्वाधिक अनुभव आहे, तसेच स्थानिक लोक, कुकी-जो जमाती आणि मेईतेई समुदायाचे अद्वितीय ज्ञान असल्याचे पत्रात नमूद केले आहे. शांततेच्या वातावरणाला चालना देण्यासाठी या प्रदेशातील संस्कृती आणि भू-राजकीय संवेदनशीलतेची त्यांची समज देखील महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे आसाम रायफल्सच्या बटालियन्स हटवल्या जावू नयेत अशी मागणी करण्यात आली.

सोलापूर शहर पोलिसांनी शोधला वाहतूक कोंडीवर उपाय

सोलापूर, दि.३ : सध्या सोलापूर शहरातील वाहनांची संख्या सात लाखांवर पोचली आहे. अरुंद रस्ते आणि त्यात पुन्हा अतिक्रमणे, यामुळे शहरात प्रवेश केल्यापासूनच वाहनधारकांना वाहतूक कोंडीचा त्रास सोसावा लागत असल्याची वस्तुस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर आता रस्त्यांवरील अतिक्रमण काढण्यापासून वाहतूक कोंडी होणाऱ्या रस्त्यांवर व चौकांमध्ये वाहतूक पोलिस बेशिस्तांवर कारवाई करणार आहेत.

'ग्रामीण'चे परमीट असूनही शहरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे. विना नंबरप्लेटची वाहने, फॅन्सी नंबरप्लेट, अनफिट वाहने, विरुद्ध दिशेने किंवा क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी, माल वाहतूक करणारी वाहने, मोबाईल टॉकिंग, नंबरप्लेटवर किंवा खासगी चारचाकीसमोर काहीतरी फलक लावलेल्या वाहनांवरही कारवाई केली जाणार असल्याचे वाहतूक पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

रिक्षा चालकांना आता प्रवासी दिसल्यावर वाटेतच अचानकपणे न थांबता इंडिकेटरचा वापर करून रिक्षा बाजूला घ्यावी लागेल, लेन कटिंगच्या नियमांचे पालन करावे लागणार आहे. दरम्यान, आता दररोज सरासरी ८०० बेशिस्त वाहनांवर कारवाई केली जात असून, बेशिस्तांना स्वयंशिस्त लागावी यासाठी कारवाईचे प्रमाण वाढविले जाणार असल्याची माहिती सहायक पोलिस आयुक्त सुधीर खिराडकर यांनी सांगितले.

मुख्यमंत्री निधीद्वारे डॉ. गोऱ्हे यांनी पत्रकार पंढरीनाथ सावंत यांना केली वैद्यकीय मदत

मुंबई, दि.३ : ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ सावंत हे हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे अतिशय निकटचे सहकारी राहिलेले आहेत, तसेच शिवसेनेचा आवाज बुलंद करणाऱ्या - मार्मिक च्या जडणघडणीमध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. मात्र, प्रकृतीस्वास्थ्याच्या कारणास्तव त्यांना बसविण्यात आलेल्या पेस मेकरची बॅटरी बदलायची आहे. त्याकरिता मोठा खर्च अपेक्षित आहे, असे लक्षात आले. त्यांचे कार्य आणि शिवसेनेसाठी दिलेले योगदान लक्षात घेऊन त्यांच्याप्रती कृतज्ञता म्हणून माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ.गोऱ्हे यांच्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत ही वैद्यकिय मदत पोहोच केली.

पंढरीनाथ सावंत यांच्या वैद्यकीय सुविधेसाठी मुख्यमंत्री निधीतून विशेष सहाय्य म्हणून १ लाख ७० हजार रुपयांचा धनादेश त्यांना उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते सुपूर्द केला. यावेळी पंढरीनाथ सावंत यांना माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या आणि सरकार त्यांच्या सोबत आहे, अशी ग्वाही दिली.

धुळे : ऑल आऊट ऑपरेशनमध्ये ६ पिस्तुल, ४ तलवारी, एक चॉपर आणि गुंगीकारक औषधे जप्त

धुळे, दि.३ : पोलिसांनी केलेल्या नाकांबदी आणि ऑल आऊट ऑपरेशनमध्ये ६ पिस्तुल, ४ तलवारी, एक चॉपर आणि गुंगीकारक औषधे जप्त केली आहेत. या कारवाईमुळे गुन्हेगारी क्षेत्रात खळबळ उडाली असून गुन्हेगारांविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल. व अशी गुन्हेगारी विरुध्दची कारवाई सातत्याने चालू राहिल, अशी माहिती जिल्हा पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली आहे. यावेळी अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे, सहाय्यक पोलिस अधिक्षक ऋषिकेश रेड्डी, तालुका पोलिस ठाण्याचे पो नि अभिषेक पाटील, आझादनगरचे पो नि निवृत्ती पवार, एलसीबीचे पो नि श्रीराम पवार. चाळीसगांव रोड पोलिस ठाण्याचे सपोनि जिवन बोरसे आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा आणि शहर वाहतुक शाखा यांच्या माध्यमातून ही नाकाबंदी आणि ऑल आऊट ऑपरेशन राबवण्यात आले. दशहत माजवण्याच्या उद्देशाने अनधिकृतपणे गावठी बनावटीचे पिस्तुल स्वतकडे बाळगणार्या ५ जणांना पकडण्यात आले. त्यांच्याकडून ६ पिस्तुल आणि ७ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत. यात शहर पोलिस ठाण्याच्या पथकाने सुरज प्रकाश मार्कड (वय २६) रा.भाईजीनगर, चितोड रोड,धुळे. आझादनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून काशिफ शेख गुलाब मोहम्मद (वय २१) रा.इब्राहिम मशिद मागे, ऐंशी फुटी रोड,धुळे. तसेच देवपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतून धर्मा दोधू मोरे रा.आरती कॉलनी देवपूर धुळे, शिरपूर तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रवि मोहन सोनी (वय २८) रा.देवझरी कॉलनी, सेंधवा यांना पकडण्यात आले. यांच्याकडून प्रत्येकी एक पिस्तुल आणि जिवंत काडतुसे तर धुळे तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीतून सुनिल उर्फ सनी धर्मा अहिरे (वय २४) रा.नाणे ता.धुळे याच्याकडून २ पिस्तुल व २ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. याशिवाय रोहित संतोष गवळी रा.लक्ष्मीनगर, गवळीवाडा धुळे याच्याकडून एक तलवार, शाहीद शाह जावेद शाह रा.अशोक नगर, दोंडाईचा याच्याकडून एक कोयता तर अजय संदीप सोनवणे रा.मोहाडी उपनगर, धुळे याच्याकडून एक तलवार व एक चॉपर, नाजिम बाली रा.चाळीसगांव रोड धुळे याच्याकडून एक तलवार व गणेश चंद्रकांत गवळी रा.आदर्श कॉलनी देवपूर धुळे याच्याकडून एक तलवार जप्त करण्यात आली आहे.

क्रांतिसिंह नाना पाटील यांची १२४ वी जयंती मुंबई महानगरपालिकेत साजरी

मुंबई, दि.३ : पत्री सरकारचे जनक व स्वातंत्र्यसेनानी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या १२४ व्या जयंतीनिमित्त महापौर दालनातील क्रांतिसिंह नाना पाटीलयांच्याप्रतिमेसउपआयुक्त (वित्त) प्रशांत गायकवाड यांनी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने आज (दिनांक ०३ ऑगस्ट, २०२४) पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. याप्रसंगी महानगरपालिका उप सचिव रसिका देसाई उपस्थित होत्या.

बीट डेंग्यू अभियानात सहभागी होऊन आपल्या घराची व परिसराची स्वच्छता राखावी - डॉ. गोफणे

पुणे, दि.३ : पिंपरी चिंचवड शहर डेंग्यूमुक्त करण्यासाठी नागरिकांनी स्वतःच्या राहत्या घराची आणि आपल्या परिसराची स्वच्छता करून डेंग्यू मुक्त शहर मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी केले आहे. शहराला डेंग्यू मुक्त करण्यासाठी महापालिकेच्या वतीने डेंग्यू मुक्त पिंपरी चिंचवड शहर ही मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार नागरिकांनी आठवड्यात एका दिवसातील एक तास आपल्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी आपल्या राहत्या घरी स्वच्छता करायची आहे. या मोहिमेअंतर्गत आज चिंचवड येथील जिजाऊ उद्यान येथे जनजागृती अभियान राबविण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ अभयचंद्र दादेवार, कार्यकारी अभियंता अनुश्री कुंभार, जेष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. संगीता तिरुमने, डॉ. ऋतुजा लोखंडे, डॉ. नासिर अलवी, डॉ. तृप्ती साळवे, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलावडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजीत सांगडे, डॉ. दिनेशकुमार जाधवर, उप अभियंता दमयंती पवार यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, आयइसी संस्थेचे स्वयंसेवक, विविध शाळेचे विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डेंग्यू मुक्त पिंपरी चिंचवड शहर म्हणजेच बीट डेंग्यू (**BEAT dengue**) या मोहीमेत जागरूकता वाढवण्यासाठी आणि डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आठवडाभर चालणाऱ्या उपक्रमांचा समावेशआहे.तसेचडेंग्यूबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे आणि डेंग्यूला रोखण हे महापालिकेचे उद्दिष्ट असून नागरी समुदायाच्या सहभाग वाढविण्यावर आणि आंतरविभागीय समन्वय राखण्यासाठी ही मोहिम उपयुक्त ठरणार आहे.

नागरिकांचा सहभाग यामध्ये महत्वाचा असून डेंग्यूला रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत नागरिकांनी जागरूक असणे गरजेचे आहे. त्यासाठी नागरिकांनी आपले घर आणि परिसर स्वच्छ ठेवावा. तसेच कुठेही पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच उपस्थित नागरिक आणि विद्यार्थ्यांनी हा संदेश आपल्या परिसरात पोहोचवावा,असे आवाहन त्यांनी केले.

बीट डेंग्यू मोहिमेअंतर्गत संपूर्ण आठवडाभर विविध क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सोशल आणि इलेक्ट्रॉनिकमाध्यमाच्याआधारे आणि आरोग्य विभागाच्या आयईसी टीम्सद्वारे मोहिमेचे नेतृत्व केले जात आहे. सामुदायिक जागरूकता उपक्रमांचे नेतृत्व एमएएस, आशा आणि एएनएम करत आहेत. यामध्ये सार्वजनिक गणेश मंडळ, स्वयंसेवी संस्था आणि ज्येष्ठ नागरिक मंच यांचा समावेश आहे. मॉल्स, थिएटर आणि उद्यानांमध्ये डेंग्यू जनजागृतीचे व्हिडिओ दाखविण्यात येत असून पॅम्प्लेट वितरण तसेच पथनाट्यांचे आयोजन देखील करण्यात येत आहे.

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public that Mr. Anil Sukanraj Shah & Mrs. Vina Anil Shah are the members of Veena Nagar C.H.S. Ltd., holding ownership rights of Flat No.A-9-303, 3rd floor, Veena Nagar C.H.S. Ltd., L.B.S.Marg, Mulund (West), Mumbai – 400 080, holding 5 shares of Rs. 50/- each bearing distinctive Nos.796 to 800 (both inclusive) under Share Certificate No.160.

Mr. Anil Sukanraj Shah & Mrs. Vina Anil Shah had lost and misplaced the Original Confirmation Deed, dated 10.04.1986 of Mr. Qasim Husain Akbar Husain Baramatiwala Between Smt. Bano Azad of Agreement for Sale, dated 24.03.1985.

Any persons having custody of the original and / or any claim in respect of the said flat or any part thereof by way of sale, exchange, mortgage, charge, gift or otherwise howsoever are hereby called upon inform the same in writing along with supporting documents in respect of their claim to the undersigned within 7 days from the date thereof, failing which the claim, if any, shall be considered to have been waived or abandoned.

Adv. HARSHAD DESAI
Advocate High Court
Flat No.B-24, Ekta C.H.S.Ltd., L.B.S.
Marg, Mulund (W), Mumbai – 400 080.
Mb. No.9820122108

---

modella

मॉडेल्ला वूलन्स लिमिटेड

सीआयएन:एल१७१२०एमएच१९६१पीएलसी०१२०८०
४ सी, वल्कॅन इंश्युरन्स इमारत, वीर नरीमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२०.
दूर.:९१-२२-२२०४७४२४/९१-२२-२२०४९८७९,
ई-मेल: modellawoollens@gmail.com,
वेबसाईट: www.modellawoollens.com

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स २०१५ नुसार येथे सूचना देण्यात येत आहे की, ३० जून, २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे व मान्यता देणे याकरीता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात **सोमवार, १२ ऑगस्ट, २०२४** रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा आयोजित करण्यात आलेली आहे.

पुढील तपशिल कंपनीच्या (www.modellawoollens.com) या वेबसाईटवर व कंपनीचे शेअर्स जेथे सुचिबद्ध आहेत त्या स्टॉक एक्सचेंजच्या अर्थात बीएसई लिमिटेडच्या (www.bseindia.com) वेबसाईटवर उपलब्ध होईल.

मॉडेल्ला वूलन्स लिमिटेडकरिता
(संदीप शाह)
ठिकाण: मुंबई **संचालक**
दिनांक: ०३.०८.२०२४ **डीआयएन:**००३६८३५०

जाहिर नोटीस

तमाम सर्व लोकांस कळविणेंत येते की, आमचे अशिल १) श्री. ललित शिवशंकर कोठारी, २) श्रीमती श्वेता ललित कोठारी यांनी मौजे सरवली, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे नंबर १५/५, क्षेत्र १००० चौरस मीटर जमीन निष्पादित दिनांक १३/०८/२०२० व नोंदणी दिनांक १४/०८/२०२० रोजी दस्त क्रमांक ३६५४/२०२०, बवड १ अन्वये विकत घेतली आहे व तसेच मौजे टेमघर, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे नंबर १३३/२/३, (जुना सर्व्हे नंबर १३३/२पैकी) या जमीनीवरील पद्मदिशा पॅराडाइज नियोजित को.ऑप.हौ.सोसायटी मधील मेट्रो स्कायलाईन या बिल्डिंग मधील तळ मजल्यावरील दुकान नंबर ४, क्षेत्र २४०.०० चौरस फुट कारपेट, दुकान नंबर ५, क्षेत्र १४३.०० चौरस फुट कारपेट, दुकान नंबर ६, क्षेत्र १११.०० चौरस फुट कारपेट व दुकान नंबर ७, क्षेत्र १५१.०० चौरस फुट कारपेट व एकोणीसाव्या मजल्यावरील सदनिका क्रमांक १९०३, क्षेत्र ४७४.०० चौरस फुट कारपेट व सदनिका क्रमांक १९०५, क्षेत्र ४४४.०० चौरस फुट कारपेट अशा मिळकती अनुक्रमे निष्पादित दिनांक २३/०१/२०२४ व नोंदणी दिनांक २४/०१/२०२४ रोजी दस्त क्रमांक १३२६/२०२४, बवड १, निष्पादित व नोंदणी दिनांक १३/०७/२०२३ रोजी दस्त क्रमांक ९७५२/२०२३ व दस्त क्रमांक ९७५३/२०२३, बवड २ अन्वये विकत घेतली आहे सदरचे सर्व मुळ दस्त आमचे अशिलांकडुन प्रवास करताना देवदया नगर परिसरात गहाळ झालेले आहे व त्यासंबंधी त्यांनी वर्तक नगर पोलिस ठाणे येथे दिनांक ३०/०७/२०२४ रोजी प्रॉपर्टी मिसिंग रजिस्टर नंबर २१७९/२०२४ अन्वये मिसिंग तक्रार नोंदविलेली आहे. तरी सदरचे सर्व मुळ दस्त कोणालाही कुठेही सापडल्यास ते त्यांनी आमच्या खालील कार्यालयीन पत्त्यावर पोहोच करावे अथवा आम्हास सुचित करावे.

सही/-
श्री. व्यंकटेश टी. चिटीकेन
(वकील)

पत्ता : २०५, दुसरा मजला, कोणार्क आर्केड, तहसिलदार ऑफीस समोर, काप कणेरी, भिवंडी, जि. ठाणे.

जाहिर नोटीस

तमाम सर्व लोकांस कळविणेंत येते की, आमचे अशिल श्री. अनिल शिवशंकर कोठारी व श्रीमती सोनु अनिल कोठारी दोघे राहणार :- ८०१, विराज टॉवर, पोखरण रोड नंबर २, ठाणे यांनी मौजे सरवली, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे नंबर १५/५, क्षेत्र १००० चौरस मीटर जमीन निष्पादित दिनांक १२/०८/२०२० व नोंदणी दिनांक १४/०८/२०२० रोजी दस्त क्रमांक ३६५३/२०२०, बवड १ अन्वये विकत घेतली आहे व तसेच **मौजे टेमघर, ता. भिवंडी, जि. ठाणे** येथील सर्व्हे नंबर १३३/२/३, (जुना सर्व्हे नंबर १३३/२पैकी) या जमीनीवरील पद्मदिशा पॅराडाइज नियोजित को. ऑप. हौ. सोसायटी मधील मेट्रो स्कायलाईन या बिल्डिंग मधील तळ मजल्यावरील दुकान नंबर १०, क्षेत्र २९८.०० चौरस फुट कारपेट अशी मिळकत निष्पादित दिनांक २३/०१/२०२४ व नोंदणी दिनांक २४/०१/२०२४ रोजी दस्त क्रमांक १३२७/२०२४, बवड १ अन्वये व तसेच बावीसाव्या मजल्यावरील सदनिका क्रमांक २२०३, क्षेत्र ४७४.०० चौरस फुट कारपेट, एकविसाव्या मजल्यावरील सदनिका क्रमांक २१०३, क्षेत्र ४७४.०० चौरस फुट कारपेट व सतराव्या मजल्यावरील सदनिका नंबर १७०५, क्षेत्र ४४४.०० चौरस फुट अशा मिळकती निष्पादित व नोंदणी दिनांक १३/०७/२०२३ रोजी दस्त क्रमांक ९७५५/२०२३, ९७५६/२०२३ व दस्त क्रमांक ९७५७/२०२३ बवड २, अन्वये विकत घेतली आहे सदरचे सर्व मुळ दस्त आमचे अशिलांकडुन प्रवास करताना देवदया नगर गहाळ झालेले आहे व त्यासंबंधी त्यांनी वर्तक नगर पोलिस ठाणे येथे दिनांक ३०/०७/२०२४ रोजी प्रॉपर्टी मिसिंग रजिस्टर नंबर २१७७/२०२४ अन्वये मिसिंग तक्रार नोंदविलेली आहे. तरी सदरचे सर्व मुळ दस्त कोणालाही कुठेही सापडल्यास ते त्यांनी आमच्या खालील कार्यालयीन पत्त्यावर पोहोच करावे अथवा आम्हास सुचित करावे.

सही/-
श्री. व्यंकटेश टी. चिटीकेन
(वकील)

पत्ता : २०५, दुसरा मजला, कोणार्क आर्केड, तहसिलदार ऑफीस समोर, काप कणेरी, भिवंडी, जि. ठाणे.

जाहिर नोटीस

तमाम सर्व लोकांस कळविणेंत येते की, आमचे अशिल मे. श्रीनाथ हाईजिन स्पेशियालिटी प्रायव्हेट लिमिटेड तर्फे अधिकृत स्वाक्षरी कर्ता डायरेक्टर श्री. मोहीत कोठारी कार्यालयीन पत्ता :- एल - ११/१२, आरएनए, कोर्टयार्ड, शांती पार्क, मिरा रोड पूर्व, ठाणे ४०११०७ यांनी मौजे पडघा, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे नंबर ९०/१/ब, जुना सर्व्हे नंबर ९०/१/अ, क्षेत्र ०-९२-६० हे. आर. प्रती + पोटखराबा ०-०८-२०, सर्व्हे नंबर ९०/२, क्षेत्र ०-९६-९० व सर्व्हे नंबर ९०/१/अ, जुना सर्व्हे नंबर ९०/१ पैकी, क्षेत्र ०-२६-८८ हे. आर. प्रती + पोटखराबा ०-३०-३० हे. आर. प्रती, एकुण क्षेत्र २-५४-८८ हे. आर. प्रती शेत जमीन निष्पादित दिनांक १०/०८/२०२१ व नोंदणी दिनांक ११/०८/२०२१ रोजी दस्त क्रमांक १०४९७/२०२१, बवड १ अन्वये विकत घेतली आहे. सदरचे मुळ दस्त आमचे अशिलांकडुन प्रवास करताना देवदया नगर परिसरात गहाळ झालेले असून त्यासंबंधी त्यांनी वर्तक नगर पोलिस ठाणे येथे दिनांक ३०/०७/२०२४ रोजी प्रॉपर्टी मिसिंग रजिस्टर नंबर २१८०/२०२४ अन्वये मिसिंग तक्रार नोंदविलेली आहे. तरी सदर दस्त कोणालाही कुठेही सापडल्यास ते त्यांनी आमच्या खालील कार्यालयीन पत्त्यावर पोहोच करावे अथवा आम्हास सुचित करावे.

सही/-
श्री. व्यंकटेश टी. चिटीकेन
(वकील)

पत्ता : २०५, दुसरा मजला, कोणार्क आर्केड, तहसिलदार ऑफीस समोर, काप कणेरी, भिवंडी, जि. ठाणे.

जाहिर नोटीस

तमाम सर्व लोकांस कळविणेंत येते की, आमचे अशिल श्री. मोहित शिवशंकर कोठारी व श्रीमती निकीता मोहित कोठारी दोघे राहणार :- ८०१, विराज टॉवर, पोखरण रोड नंबर २, ठाणे यांनी **मौजे सरवली, ता. भिवंडी, जि. ठाणे** येथील सर्व्हे नंबर १५/३/अ/१, क्षेत्र १८२० चौरस मीटर जमीन निष्पादित व नोंदणी दिनांक ०५/०२/२०१८ रोजी दस्त क्रमांक ९०३/२०१८, बवड १ अन्वये विकत घेतली आहे व मौजे सरवली येथील सर्व्हे नंबर १५/५, क्षेत्र १००० चौरस मीटर जमीन निष्पादित व नोंदणी दिनांक २३/०९/२०२० रोजी दस्त क्रमांक ४७३८/२०२०, बवड अन्वये विकत घेतली आहे तसेच मौजे टेमघर, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्व्हे नंबर १३३/२/३, (जुना सर्व्हे नंबर १३३/२पैकी) या जमीनीवरील पद्मदिशा पॅराडाइज नियोजित को. ऑप. हौ. सोसायटी मधील मेट्रो स्कायलाईन या बिल्डिंग मधील तळ मजल्यावरील दुकान नंबर ८, क्षेत्र २३३.०० चौरस फुट कारपेट व दुकान नंबर ९, क्षेत्र २५५.०० चौरस फुट कारपेट अशी मिळकत निष्पादित दिनांक २३/०१/२०२४ व नोंदणी दिनांक २४/०१/२०२४ रोजी दस्त क्रमांक १३२५/२०२४ अन्वये विकत घेतली आहे व तसेच विसाव्या मजल्यावरील सदनिका क्रमांक २००३, क्षेत्र ४७४.०० चौरस कारपेट व सदनिका क्रमांक २००४, क्षेत्र ४८१.५ चौरस फुट कारपेट अशा मिळकती निष्पादित व नोंदणी दिनांक १३/०७/२०२३ रोजी दस्त क्रमांक ९७५४/२०२३ व ९७६१/२०२३, बवड २, अन्वये विकत घेतली आहे. सदरचे सर्व मुळ दस्त आमचे अशिलांकडुन प्रवास करतना देवदया नगर परसिरात गहाळ झालेले असून त्यासंबंधी त्यांनी वर्तक नगर पोलिस ठाणे येथे दिनांक ३०/०७/२०२४ रोजी प्रॉपर्टी मिसिंग रजिस्टर नंबर २१७८/२०२४ अन्वये मिसिंग तक्रार नोंदविलेली आहे. तरी सदरचे सर्व मुळ दस्त कोणालाही सापडल्यास ते त्यांनी आमच्या खालील कार्यालयीन पत्त्यावर पोहोच करावे अथवा आम्हास सुचित करावे.

सही/-
श्री. व्यंकटेश टी. चिटीकेन
(वकील)

पत्ता : २०५, दुसरा मजला, कोणार्क आर्केड, तहसिलदार ऑफीस समोर, काप कणेरी, भिवंडी, जि. ठाणे.

रोज वाचा
दै. 'मुंबई लक्षदीप'

ब्राह्मण सेवा संघ, बोरिवली वार्षिक सर्वसाधारण सभा

सूचना

ब्राह्मण सेवा संघ, बोरिवली, या संस्थेची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता ज्येष्ठ नागरिक सेवा संघ (ज्येष्ठालय), जानुस अपार्टमेंट समीर, टी. पी. एस. रोड, बाभई, बोरीवली पश्चिम मुंबई -९१ येथे संपन्न होणार आहे.

सर्व सभासदांना संस्थेच्या कार्यालयात नोंद असलेल्या पत्त्यावर यापूर्वीच टपालाने, किंवा कार्यकर्त्या सोबत लिखिता पाठवून कळविण्यात आले आहे. तरी सर्व सभासदांनी याची कृपया नोंद घेऊन सभेसाठी वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

कार्यकारी मंडळाकरीता
सही/-
सुशील. र. जोशी
कार्यवाह

जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीसीव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, **कै. किर्तीकुमार वसंत साळवी व कै. रश्मी के. साळवी,** हे **सदनिका क्र. ए/००४, तळ मजला, अथर्व को.ऑ.हौ.सो.लि., गांव मौजे समेळ, नालासोपारा (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर - ४०१ २०३** चे मालक होते तरी वरील संयुक्त मालकांपैकी **कै. किर्तीकुमार वसंत साळवी** यांचे **दिनांक ०९/०५/२०२३** रोजी निधन झाले आहे आणि **कै. रश्मी के. साळवी** यांचे ही **दिनांक २०/०५/२०२४** रोजी निधन झाले आहे आणि आता **कै. किर्तीकुमार वसंत साळवी व कै. रश्मी के. साळवी** यांच्या पश्चात त्यांचा मुलगा **श्री. विशाल किर्तीकुमार साळवी** हाच त्यांच्या एकमेव वारस आहे. तरी त्याच आधारे माझे अशिल **श्री. विशाल किर्तीकुमार साळवी** यांनी सदर मयत सभासदाचे भाग व हितसंबंध आपल्या नावे हस्तांतरीत करण्यासंबंधी अथर्व सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत संस्थेकडे अर्ज केला आहे. त्याचप्रमाणे **कै. रश्मी के. साळवी आणि श्री. विशाल किर्तीकुमार साळवी** यांच्यात **दिनांक १६/०४/२०२४ रोजी** हक्कसोडपत्र ही बनविण्यात आले आहे ज्याचा **दस्त क्र. वसई-३-७५१३-२०२४, दिनांक १६/०४/२०२४** असा आहे ज्याव्दारे **कै. किर्तीकुमार वसंत साळवी** यांचा ५० टक्के हिस्सा हा **श्री. विशाल किर्तीकुमार साळवी** ह्यांच्या नावे हस्तांतरीत करण्यात आला होता.

तरी या नोटीशीव्दारे संस्थेच्या भांडवलात मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचे अन्य वारसदार किंवा मागणीदार हरकतदार यांच्याकडुन हक्क मागण्या हरकती मागवण्यात येत आहेत किंवा सदर मिळकती संबधी अन्य कोणाचाही कोणताही विक्री, कुळरग, कब्जा, गहाण, दान, बक्षीस, करार, मृत्युपत्र, कोर्ट दरबार वा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी त्याबाबत लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिदध झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत मला खालील पत्यावर कळवाव्यात अन्यथा तसा कोणचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, हिस्सा, अधिकार नाही व असल्यास तो सोडुन दिला आहे असे समजण्यात येईल आणि सदर सदनिकेसंबंधीची पुढील योग्य ती कार्यवाही आमचे अशिल यांच्याकडुन करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
ॲड. निशिगंधा जयंत परब.

पत्ता : ए/१०१, काशी कृपा को.ऑ.हौ.सो.लि., दिपक मेडीकल जवळ, एस. टी. डेपो रोड, नालासोपारा (प) - ४०१ २०३.

जाहीर सूचना

सर्वसामान्य जनतेस येथे सूचना देण्यात येत आहे की, माझे अशील **श्रीमती हीना हेमल दोशी** व **श्री. हेमल जयेंद्र ऊर्फ जयेंद्रभाई दोशी** हे फ्लॅट क्र.६, २रा मजला, संजय इमारत, मंछुभाई रोड, राणा कॉटेज, मालाड (पुर्व), मुंबई-४०००९७, क्षेत्रफळ ५५० चौ.फु. कार्पेट या जागेचे कायदेशीर सह-मालक आहेत, जे त्यांनी **श्रीमती नेत्रावती पद्माकर शेणॉय** यांच्याकडून दस्तावेज क्र.बीडीआर-२/०८१२७/२०१२ नुसार नोंद असलेले दिनांक १८.०९.२०१२ रोजीच्या विक्री करारनामानुसार संयुक्तपणे खरेदी केले होते आणि सदर **श्रीमती नेत्रावती पद्माकर शेणॉय** यांनी सदर फ्लॅट **मे. सोना बिल्डर्स** यांच्याकडून दिनांक १२.०७.९४ रोजीचे दस्तावेज क्र.बीबीएम-१/९९३/१९९३ नुसार नोंद असलेले दिनांक १९.०३.१९९३ रोजीच्या करारनामानुसार खरेदी केले होते. सदर **श्री. हेमल जयेंद्र ऊर्फ जयेंद्रभाई दोशी** यांचे १९.०३.२०१९ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात **श्रीमती सरयुबेन जयेंद्र दोशी (आई)**, **श्रीमती हीना हेमल दोशी (पत्नी)**, **श्री. हर्ष हेमल दोशी** व **श्री. प्रिन्स हेमल दोशी (मुले)** हे कायदेशीर वारसदार असून मालक म्हणून त्यांचे ५०% शेअर्स वापर, प्राप्त करण्याचे अधिकार आहेत. दिनांक २९.०५.२०२४ रोजीचे दस्तावेज क्र.बीआरएल-५/९७७२/२०२४ नुसार नोंद असलेले दिनांक २९.०५.२०२४ रोजीच्या मुक्तता करारनामानुसार सदर **श्रीमती सरयुबेन जयेंद्र दोशी, श्री. हर्ष हेमल दोशी** व **श्री. प्रिन्स हेमल दोशी** यांनी त्यांचे अविभाजीत शेअर्स माझे अशील **श्रीमती हीना हेमल दोशी** यांच्या नावे मुक्त केले आणि तेव्हापासून माझ्या अशिलाकडे एकमेव मालक म्हणून सदर फ्लॅटचा वापर, वहिवाट व ताबा आहे. दिनांक १९.०३.१९९३ रोजीचे मुळ करारनामा माझे अशील **श्रीमती हीना हेमल दोशी** यांच्याकडून हरवले/गहाळ झाले आहे आणि याबाबत दिंडोशी पोलीस ठाणे येथे दिनांक ३०.०७.२०२४ रोजी ऑनलाईन एन.सी. तक्रार क्र.८६०४९/२०२४ नुसार तक्रार नोंद करण्यात आली आहे.

जर कोणा व्यक्तीस सदर मुळ करारनामा सापडल्यास खालील स्वाक्षरीकर्त्याकडे कळवावे आणि जर कोणा व्यक्तीस, बँकेस, वित्तीय संस्थेस सदर फ्लॅटबाबत वारसाहक्क, शेअर, विक्री, तारण, भाडेपट्टा, मालकीहक्क, परवाना, बक्षीस, ताबा किंवा अन्य इतर प्रकारे कोणताही दावा किंवा अधिकार असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात आवश्यक दस्तावेजांसह सदर जाहीर सूचना प्रकाशन तारखेपासून **१५ दिवसांत** खालील स्वाक्षरीकर्त्याकडे कळवावे. अन्यथा अशा व्यक्तींचे दावा त्याग किंवा स्थगित केले आहेत असे समजले जाईल.

ठिकाण: मुंबई दिनांक: ०४.०८.२०२४

रमेश चंद्रा तिवारी
(वकील उच्च न्यायालय, मुंबई)
कार्यालय: १२९, ए-विंग, आपली एकता कोहौसोलि., लिला हॉटेलजवळ, नवपाडा, मरोळ नाका, अंधेरी (पुर्व), मुंबई-४०००५९.

वकील: मोटगी

जाहीर नोटीस

वसई येथील मा. श्री. के. जी. सावंत, सह दिवाणी न्यायाधीश व स्तर, वसई ह्याच्या न्यायालयात

ने. त. ०४/०९/२०२४
रे. मु. नं. ९०/२०२३
नि. क्र. ११

Mrs Priti W/o. Sanjay Keni & Others .... Plaintiff
V/s
Mr. Sanjay S/o. Anant Keni & Others ...Defendants

ज्याअर्थी श्री संजय अनंत केणी हे दि. १२/१०/२०१६ रोजी घरात कोणालाही काही न सांगता निघून गेलेले आहेत. त्यानंतर आजपर्यंत घरी परत आले नाहीत.

सदर बेपत्ता इस्माबाबत वादी यांनी दि. १६/१०/२०१६ रोजी अर्नाळा सागरी पोलीस स्टेशन येथे खबर दिली असून अर्नाळा सागरी पोलीस स्टेशन मनुष्य बेपत्ता रजिस्ट्रर नंबर ५३/२०१६ असा आहे. वादी यांनी या न्यायालयात **नियमित दिवाणी दावा क्रमांक** ९०/२०२३ हा स्पेसिफिक रिलीफ कायदा कलम ३४ अन्वये श्री. संजय अनंत केणी हे मयत झाले आहेत असे घोषित करून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

तरी, सदर दाव्याबाबत किंवा बेपत्ता इस्माबाबत कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या. आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर हे न्यायालय श्री. संजय अनंत केणी यांना मयत असल्याचे घोषित करेल.

आज दिनांक ०२/०८/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

हुकुमावरून
अधीक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर वसई